६ भा. व्याकरण

मराठी लेखन पध्दतींचे

बुक

म. ग्रं. सं. ठाणे
२२७.
१८८०

Marathee Letter Writing

# लेखनपद्धतीचें बुक पुणें येथें ज्ञानप्रकाशछापखान्यांत छापिलें

सन १८५०

# मान्यांची अनुक्रमणिका.

पृष्ठं

९ श्रीदेवास व श्रीगुरूस.
१० गुरूस व गुरुपत्नीस.
११ श्रीस्वामी सन्यासी.
१२ पुत्रानें पित्यास व मातेस गुरूनें शिष्यास
१३ गुरुपत्नीनें शिष्यास व
१४ कन्येने पित्यास.
१४ मातुश्रीनें पुत्रास व कनिष्ट बंधुनें वडील बंधुस
१५ वडील बंधुनें कनिष्ट बंधुस व वडील बहिणीस.
१६ वडील बहिणीनें कनिष्ट बंधुस व आजा चुलता काका मामा सासऱ्यांस
१७ आस आपल्यापेक्षां कनिष्ठ असेल त्यास व यजमानास
१८ सामान्य यजमानास व

पृष्ठं

१९ यजमानानें सेवकास व आजी चुलती मामी इत्यादि.
२० पित्यानें कन्येस व साधु संता० साधुनी गृहस्थास व गृहस्था
२१ नी शास्त्र्यास
२१ शास्त्र्यानें शास्त्र्यास व गृहस्थास
२२ गृहस्थानें वैदिकास व आश्रित ब्राह्मणानें गृहस्थास व गृहस्थानें सामान्य आश्रिता०
२३ सामान्य पक्ष आश्रितानें गृहस्थास व गृहस्थानें आश्रिता०
२३ सामान्य आश्रितानें गृहस्थास व सामान्य भिक्षुकानें यजमानास.
२४ गृहस्थानें गृहस्थास व भिक्षुकानें गृहस्थास व गृहस्थानें भिक्षुक ब्राह्मणास.

पृष्ठें.

२६ थोर गृहस्थानें मध्यम गृहस्थास व कनिष्ठ पदवीचा०
२७ राजाधिकारीयास व योग्यतेच्या मराठ्यांस.
२८ मराठ्यानें गृहस्थांस.
२९ सामान्य मराठ्यानें सामान्य गृहस्थास व गृहस्थानें सामान्य मराठ्यांस.
३० कनिष्ट पक्षी मराठे किंवा लेंकवळायास व भिक्षुक ब्राह्मणास खेरीजजातींनी
३१ थोर पदवीचानें हल्के पदवीचास व सेवकानें धन्यास व धन्यानें सेवकास.
३२ थोर पदवीचे सुवासिनी बायकोस गृहस्थानें.
३३ सामान्य सुवासिनीस व थोरपदवीचे विधवेस.
३४ मध्यम कनिष्ट विधवांस.

पृष्ठें.

३५ मराठ्यानें किंवा वाण्यानें ब्राह्मणास व कुमारिकेस बापानें अथवा तिचे वडीलयांणीं.
३६ कुमारिकेस परक्यानें व गुजराथीवाणी गुजर भाट्येयांस.
३७ हुंडीपत्र.
३८ कुणबीण अथवा बंदी यास सोडपत्र व वेव्हारी पाव...
४० फारिखत.
४१ कर्जरवत.
४२ हामेबंदीखत.
४४ गाहाणखत.
४५ जामीनखत.
४६ राजीनामा.
४७ करारपत्र.
४८ साटेपत्र.
५० खरेदीपत्र.
५१ वायदे रोखा.
५२ बैरागीयांस पत्र

पृष्ठें.

५३ गोसावी व कानडेयाणी.

५४ लग्नपत्र

५५ व्रतबंध व सन्यासीयाणें गृहस्थांस.

५६ पुरुषानें आपले स्त्रीस. स्त्रीनें भ्रतारास.

५८ योग्यतेचे यवनलोकांस.

५९ सामान्य यवनास व साधारण साहेबलोकांस

६० थोरपदवीचे ब्राह्मणानें साहेबलोकांस.

६१ थोरपदवीचे ब्राह्मणास यवनलोकांनीं.

६२ राजेभोसलेयांस साहेबलोकांनीं.

६३ थोरगृहस्थानीं कलेक्टर रिसिडेंट साहेबलोकयांस.

६३ गवरनरसाहेबास अर्ज.

६४ कारकूनयाणें साहेबलोकांस

पृष्ठें.

६९ सदरअदालतींतराजीनामा.

६५ सरकारांत पावतीदेणें.

६६ मुकत्यारनामा व फकिरासपत्र लिहिणें

६७ शूर सरदारांस

६९ थोरपदवीचानीं सेवकास व वरावरीच्यांस

७० थोरयोग्यतेच्यास व यवनानीं हिंदुलोकांस.

७१ यवनचालींतलेंकाने बापास व बापानें लेंकास व सरकारांतुन मामलेदारांस.

७२ यवनसरकारांतुन उमेदवारास व जमीदार व साकदमांस व लेंकानें आईस.

७३ सातारकर महाराजांस व महाराजानीं सेवकांस

[illegible]
[illegible]

[illegible]
[illegible]
[illegible]

# प्रस्तावना.

जातिमात्रानीं एकमेकांस परस्परें पत्रें लिहिणें तीं कोणत्या शिरस्त्यानें कशीं ल्याहावीं येविषयींचें लहान मुलांस परिज्ञान चांगलें व्हावें ह्मणून लोकोप कारास्तव हे माने छापून प्रसिद्ध केले आहेत. याचे कर्ते याहीं प्राचीन लिहिण्याचे शिरस्ते मेळऊन सुज्ञलोकांचे साह्यतेनें शुद्ध करून प्रसिद्ध केले आहेत.

मुख्यत्वें करून कारण हेंच आहे कीं आपण ज्यास पत्र लिहिणार त्याची जात कोण व योग्यता कशी आहे हें व आपली लिहिणाराची जात कोण आणि योग्यता कशी याचा विचार लक्षांत आणून तदनुसार माना किंवा मजकूर यथायोग्य गौरव युक्त ल्याहावा.

सदरींचा माना तीर्थरूप किंवा तीर्थस्वरूप अथवा राजश्री पासून अपत्यें अथवा पोष्य पोष्यांकित किंवा स्नेहांकित पर्यंत लिहिणे तो यवनादि बाह्यजाती खेरीज करून सर्वांनीं जात्याधिकार परत्वें ल्याहावें.

खालीं प्रसिद्धमान्यांत विशेषण असें ह्मटलें आहे त्याचा अर्थ असा कीं बाबा, काका, नाना, तात्या, अंणा, भाऊ, आपा, मामा, दादा, राव, रावजी, साहेब इत्यादि यांस

विशेषण अशी संज्ञा आहे.

ब्राह्मणजातींत ब्राह्मणानें ब्राह्मणांस नमस्कार अथवा साष्टांगनमस्कार किंवा शिरसाष्टांगनमस्कार ल्याहावा. वरकडांस जातिपरत्वें ब्राह्मणानें शिरस्त्याप्रमाणें ल्याहावें.

इतर जातींनीं ब्राह्मणास नमस्कार लिहूं नये. हा पूर्वापार युगायुगीं संप्रदाय चालत आला त्यास शास्त्राधार आहे. बाह्यजाती खेरीज वरकडानीं एकमेकास भेदपरत्वें प्रणाम, दंडवत, रामराम, जयगोपाळ, जयकृष्ण, जयहर, नारायण, जयसीताराम, भगवत्स्मरण, शिव शरणार्थ, शरणशरणार्थ, नमोस्तु आशीर्वाद इत्यादि ल्याहावें.

आपलेपेक्षां विद्येकरून किंवा द्रव्येंकरून अथवा पदवीपरत्वें योग्यतेकरून श्रेष्ठ असल्यास विनंती पर्यंत लिहिल्यावर पुढें उपरी ह्मणून लिहूं नये विनंती येथील कुशळ असें ल्याहावें.

स्त्रियानीं स्त्रियांस अथवा पुरुषानीं स्त्रियांस किंवा स्त्रियानीं पुरुषास लिहिणें जाहाल्यास जिचा भ्रतार आहे तिला सौभाग्यवती व जिचा भ्रतार निवर्तला तिला गंगाभागीरथी ह्मणून ल्याहावें कुमारिका ह्मण

जे जिचें लग्न झालें तिला दोहींतून कांहींच नाहीं.

अंत्यजादि बाह्यजाती ह्या हिंदु धर्मांत आहेत परंतु दुराचरणादि हिंसा कर्म करितात यास्तव त्यांस बाह्यजाती ह्मणतात. याजातींत परस्परें एकमेकास लिहिणें झाल्यास वडिलांस तीर्थरूप किंवा तीर्थस्वरूप राजश्री नाव विशेषण मुकाम वडिलांचे शेवेशी अपत्ये नाव बिनाव मुकाम लिहून दंडवत किंवा अभिवंदन असें ह्मणावें चिरंजीव मंडळीस आशीर्वाद ल्याहावे इतरांस राजश्री नाव बिनाव याशि स्नेहांकित नाव बिनाव रामराम जोहार याप्रमाणें ल्याहावें श्रेष्ठजातीस दंडवत अभिवंदन रामराम जोहार असें ल्याहावें.

श्रेष्ठजातीनी बाह्यजातीस आशीर्वाद रामराम जोहार भगवत्स्मरण असें ल्याहावें.

यवनजातीनीं सर्वजातीस व सर्वजातीनी यवन जातीस अजम व सलाम बाजद सलाम व ज्यादा कायलिहिणे प्यार मोहबत असों दीजे हे किताबत याचरीतीनें ल्याहावें.

# माने प्रारंभ.

[stamp]

श्लोक

आदौश्रीगणराजवंदुनपुढेंलक्ष्मीपतीलानमी त्यामागेंगि
रिजापती शिवभलातोवंदिलाआजमी सूर्यालामगशक्तिला
हिनमितों जिव्हेसिसंस्कारहा ऐसानुक्रमसाधुनीकरितसेंभा
वेंनमस्कारहा १

श्रीदेवास पत्रिका.

श्रीमत् षड्गुणैश्वर्यसंपन्न भक्तजन प्रतिपा
लक दुष्टजन निकृंतन श्रीनाव

दासानुदास नाव बिनाव आडनाव कृतानेक साष्टांग नम
नमस्कार अथवा प्रणाम दंडवत् विज्ञापना तागाईत महिना
पक्ष तीथ वार पावेतों श्रीचे कृपावलोकनें करून शरणाग
ताचें वृत्त यथास्थित असे विशेष. मजकूर लिहिणे असे
तरतो त्याहावा दीनाचा मनोगत निवेदन होय हेविज्ञापना.

श्रीगुरूस.

श्रीमत्ब्रह्मानंदपददायक अचिंत्यागम अनु
पमज्ञान घन गुरु मूर्ति राजश्री नाव विशेषण
वडिलांचेशेवेसि

असतें नाव विनाम आडनाव मुकाम करद्वयजोडून त्रिकाळ शिरसाष्टांगनमस्कार अथवा दंडवत् विज्ञापना तागाईत महि ना पक्ष तीथ वारपर्यंत वडिलाचे आशीर्वादेंकरून सुखरूपअ सों विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा. सदादीत पत्र पाठउन बाळकाचा सांभाळ केला पाहिजे शेवेशिविदित होयहे विज्ञापना.

श्रीगुरूस २

श्रीमत्सकळज्ञानघनकैवल्यपद
दायकअज्ञानतिमिरछेदकसनातन
गुरुमूर्तिनाव विशेषण स्वामीचे शेवेशि

चरणरज नाव विनाव आडनाव मुकाम शिरसाष्टांगनमस्का र अथवाप्रणाम दंडवत विज्ञापना तागाइत महिनापक्ष तीथ पावेतों सुखरूप असों विशेष मजकूर लिहिणें असेल तोल्या हावा निरंतर पत्र पाठउन सांभाळीत असावें शेवेशिश्रुत हो यहे विज्ञापना.

गुरुपत्नीसपत्र.

तीर्थस्वरूप सौभाग्यवती अथवा विधवा अ
सल्यास गंगाभागीरथी मातुश्री समान नाव
विशेषण वडिलांचे शेवेशि.

अपत्यासमान नाव बिनाव आडनाव साष्टांगनमस्कार अथवा प्रणाम दंडवत विज्ञापना तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों मुकाम येथें सुखरूप असों विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा सदैव आशीर्वाद पत्रिका पाठऊन सांभाळ केला पाहिजे विदित होय हे विज्ञापना.

स्वामी सन्यासी यांस लिहिणें तर त्यांचे मठाचे संप्रदायानुरूप कमजास्त विशेषणाचे नांवे असतात सर्वांसि एकच माना नाहीं परंतु संस्थानाधिकारी सन्यासाचे रीज फिरस्ते सन्यासी कितेक आहेत त्यांस लिहिण्याचा शिरस्ता.

श्रीमत् परमहंस सच्चिदानंद अद्वयबो
धनिरूपाधिनिर्मलकीर्तिसदैव नाराय
णस्मरणीरत श्री स्वामीचें नाव स्वामी
चरणारविंदीं.

अखंडदंडायमान चरणरजांकित नाव बिनाव आडनाव मुकाम दोनी कर जोडून साष्टांगनमस्कार किंवा कृतानेक प्रणाम पूर्वक दंडवत विज्ञापना तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों स्वामीचे कृपेकरून सुखरूप असों विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा सर्वदा पत्रद्वारें सांभाळ होत असावा विदित होय हे विज्ञापना

## पुत्रानें पित्यास.

तीर्थरूप राजश्री नाव विशेषण मुकाम
वडिलांचे शेवेशि

अपत्यें नाव याणें दोनी कर जोडून त्रिकाळ चरणावर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार अथवा प्रणाम दंडवत विज्ञापना तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा निरंतर आशीर्वाद पत्रिका येऊन बाळकाचा सांभाळ होत असावा शेवेशि विदित होय हे विज्ञापना.

## पुत्रानें मातुश्रीस.

तीर्थरूप सौभाग्यवती वज्रचुडे मंडित मातुश्री अथवा विधवा असल्यास गंगाभागीरथी नाव विशेषण मुकाम वडिलांचे शेवेशि.

अपत्यें नाव याणें त्रिकाळ चरणावर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार किंवा प्रणाम दंडवत विज्ञापना तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वडिलांचे आशीर्वादें करून अमुक मुकामी सुखरूप असें विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा सदैव आशीर्वाद पत्र पाठऊन बाळकाचा सांभाळ केला पाहिजे शेवेसि विदित होय हे विज्ञापना.

## गुरूनें शिष्यास १

शिष्यवर्य चिरंजीव विजयीभव राजश्री नाव बिनाव आड नाव मुकाम अनेक आशीर्वाद उपरी येथील क्षेम तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों सुखरूप असो विशेष मजकूर लिहिणें असेल तो त्याहावा सदोदित पत्र पाठऊन संतोषवीत जाणें बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

## गुरूनें शिष्यास २

शिष्यवर्यामाजी मुकुटमणी विवेकरत्नाची
खाणी राजमान्य राजश्री नाव बिनाव आड
नाव मुकाम यांशि.

प्रीतिपूर्वक नाव मुकाम अनेक आशीर्वाद उपरि येथील क्षेमतागाईत महिना पक्ष तीथ पर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो त्याहावा सदैव पत्रद्वारें संतोषवित असावें बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

## गुरुपत्नीनें शिष्यास.

शिष्यवर्य राजमान्य राजश्री नाव बिनाव आड नाव मुकाम याशि प्रति सौभाग्यवती अथवा गंगाभागीरथी नाव मुकाम अनेक आशीर्वाद उपरि येथील कुशल तागाईत मास पक्ष तीथ पर्यंत सुखरूप असो विशेष मजकूर लिहिणें असेल तो त्याहावा निरंतर पत्र प्रेषणीं तुम्हाकडील कुशलवृत्त लिहित जावें बहुत काय लिहि

हिणें लोभकीजे हे आशीर्वाद.

## कन्येने पित्यास.

तीर्थरूप राजश्री नाव बाबा मुकाम

वडिलांचे शेवेसि

अपत्यें सौभाग्यवती किंवा गंगाभागीरथी नाव आडनाव दोन्ही कर जोडून नमस्कार अथवा प्रणाम दंडवत विज्ञापना तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वडिलांचे आशिर्वादेंकरून सुखरूप० सें विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा शेवेसि विदितहो य हे विज्ञापना.

## पित्यानें पुत्रास.

श्रियासह महत्स्वायु चिरंजीव राजश्री नाव आडनाव मुकाम यां सि प्रति नाव बिनाव आडनाव अनेक आशीर्वाद उपरि येथील क्षेम तागाईत महिना पक्ष तीथ पर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो लिहावा वरचेवर पत्र पाठउन सविस्तर लिहित जाणें बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशी र्वाद.

## मातुश्रीनें पुत्रास.

श्रियाशह महत्स्वायु चिरंजीव राजश्री नाव आडनाव मुकाम यांशिप्र ति सौभाग्यवती अथवा गंगाभागीरथी नाव आडनाव मुकाम अने क आशीर्वाद उपरि येथील क्षेम तागाईत महिना पक्ष तीथ पर्यंत

वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो लिहून वरचेवर पत्र पाठवून संतोषवित जाणें बहुत काय लिहिणे लोभकीजे हे आशीर्वाद.

## वडीलबंधुस कनिष्ठानें.

तीर्थस्वरूपराजश्री नाव विशेषण आ
डनाव मुकाम वडिलांचे शेवेसि

अपत्यासमान नाव य. गें दोन्ही कर जोडून शिरसाष्टांगनमस्कार अथवा दंडवत विज्ञापना तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून अमुक मुकामीं सुखरूप असों विशेष मजकूर लिहिणें असेल तो लिहून सदैव पत्र पाठवून बाळकाचा सांभाळ केला पाहिजे बहुत काय लिहिणें शेवेसि श्रुत होय हे विज्ञापना.

## वडीलबंधुनें कनिष्ठास.

श्रियासहस्त्रायु चिरंजीव राजश्री नाव बिनाव आडनाव मुकाम यांशि प्रति नाव बिनाव आडनाव मुकाम आशीर्वाद उपरि येथील क्षेम तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो लिहावा वरचेवर पत्र पाठवून सविस्तर लिहित जावें बहुत काय लिहिणें लोभकीजे हे आशीर्वाद.

## वडील बहिणीस.

तीर्थस्वरूप सौभाग्यवती अथवा
गंगाभागीरथी मातुश्री समान ना
व विशेषण वडिलांचे शेवेसि.

अपत्यें नाव बिनाव आडनाव मुकाम शिरसाष्टांग नमस्कार अथवा प्रणाम दंडवत विज्ञापना तागाईत महिना पक्ष तीथपा वेतों सुखरूप असों विशेष मजकूर लिहिणें असेल तो त्याहा वा सदोदित पत्र पाठवून बाळकाचा सांभाळ केला पाहिजे बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

## वडीलबहिणीनें कनिष्टबंधुस.

चिरंजीव राजश्री नाव विशेषण आडनाव मुकाम यांसिप्रति सौभाग्यवती अथवा गंगाभागीरथी नाव आडनाव मुकाम अनेक आशीर्वाद उपरि येथील क्षेम तागाईत महिना पक्ष तीथ पर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो लिहावा वारंवार पत्रद्वारें कुशलवृत्त लिहितजावें बहुत काय लिहिणें लोभकीजे हे आशीर्वाद.

## आजा, चुलता, काका, मामा, सासरा, यांस.

तीर्थस्वरूप राजश्री नाव विशेषण आडनाव
मुकाम वडिलांचे शेवेसि.

अपत्यें नाव आडनाव मुकाम दोन्हीकर जोडून शिरसाष्टांगन मस्कार अथवा प्रणाम दंडवत विज्ञापना तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असें विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा. निरंतर पत्रद्वारें सांभाळ करीत अशिलें पाहिजे शेवेसि विदित होय हे विज्ञापना.

## आमस्वकीय आपलेपेक्षां कनिष्ट असेलत्यास.

चिरंजीव विजयी भव राजश्री नाव विनाव आड नाव मुकामयां शि प्रति नाव विनाव आडनाव मुकाम अनेक आशीर्वाद उपरि येथील क्षेम तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों समस्त सुखरूपअसों विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा. सर्वदा पत्र पाठवून सविस्तर लिहित असावें बहुत काय लिहिणे लोभकीजे हे आशीर्वाद.

## थोरपदवीचे यजमानास सेवकानें.

श्रीमंत राजश्री नाम साहेब स्वामीचे शेवेसि.

विनंती सेवक नाव विनाव आडनाव मुकाम दोन्हीकर जोडून साष्टांग नमस्कार अथवा प्रणाम दंडवत विज्ञापना तागाईत महिना पक्ष तीथ वार पावेतों स्वामीचे कृपें करून सेवकाचें वृत्त उत्तम असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा निरंतर पत्र पाठऊन सेवकाचा सांभाळ केला पाहिजे शेवेसि विदित होय हे वि

ज्ञापना.

## सामान्य पक्ष यजमानास.

राजश्रीयाविराजित राजमान्य राजश्री

नाव साहेब स्वामीचे सेवेसि

आज्ञाधारक नाव विनाव आडनाव मुकाम कृतानेक साष्टांग नमस्कार अथवा प्रणाम दंडवत विनंती विज्ञापना तागाईत महिला पक्ष तीथ पावेतों आपल्ये कृपावलोकनें करून सुखरूप असें विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा सदैव पत्र पाठवून सांभाळ केला पाहिजे बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विज्ञापना.

## सेवकास यजमानाने.

राजश्री नाव बिनाव आड नाव मुकाम

स्वामी गोसावी यांशि.

प्रतिपाळक नाव बिनाव नमस्कार अथवा प्रणाम दंडवत रामराम विनंती उपरि मजकूर लिहिणे असेल तो ल्याहावा वरच्येवर पत्र पाठवून सविस्तर वृत्त लिहित जावें रवाना इंग्रेजी तारीख अमुक महिना अमुक सन अमुक अथवा चंद्र किंवा मिती शक संवत्सर सुरुसन लिहावा बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

## सेवकास सामान्य पदवीचे यजमानाने.

राजश्री नाव बिनाव आडनाव मुकाम स्वामी
चे सेवेसि.

पोष्य नाव बिनाव नमस्कार प्रणाम दंडवत रामराम विनंती उपरियेथील कुशल तागाईत मिती तारीख किंवा चंद्र महिना पर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणे असेल तो ल्याहावा वरचेवर पत्र पाठवितजाणें बहुत काय लिहिणें लोभकीजे हे विनंती.

### आजी, चुलती, मामी इत्यादि आप्त स्त्रिया वडील असतील त्यांस.

तीर्थस्वरूप सौभाग्यवती अथवा गंगा
भागीरथी मातुश्रीसमान नाव विशेष
ण मुकाम वडिलांचे सेवेसि.

अपत्यासम नाव बिनाव आडनाव मुकाम दोन्ही कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार अथवा प्रणाम दंडवत विज्ञापना तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असें विशेष मजकूर लिहिणे असेल तो ल्याहावा निरंतर आशीर्वादपत्र पाठवून सांभाळित असावें सेवेसि विदित होय हे

विज्ञापना.

## पित्यानें कन्येस.

चिरंजीव सौभाग्यवती किंवा गंगाभागीरथी नाव विशेषण आड नाव मुकाम यांशिप्रति नाव बिनाव आडनाव मुकाम आशीर्वाद उपरी येथील क्षेम तागाईत महिना पक्ष तीथ पर्यंत समस्त सुखरूप असों विशेष मजकूर लिहिणे असेल तो ल्याहावा. सदैव पत्र पाठवून संतोष देत जाणें बहुत लिहिणें हे आशीर्वाद. याच मान्यानें आजा चुलता मामा काका सासरा वडील आसअसेल त्याणें ल्याहावें.

## साधू संतास.

हारगुरुभक्तिपरायणराजमान्यरा
जश्री नाव विशेषण मुकामस्वा
मीचे शेवेसि अथवा स्वामीगोसा
वी यांशि.

चोथ्यांकित अथवा दासानुदास नाव बिनाव आडनाव मुकाम त्रिवार साष्टांग नमस्कार प्रणाम दंडवत विनंती विज्ञापना तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों आपले कृपे करून सुखरूप असों विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा सदैव पत्र प्रेषणाद्वारें संतोषवित असावें बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंती

## साधुसंतानीं गृहस्थास.

राजश्रीयाविराजितराजमान्यराजश्री नाव

बिनाव आडनाव मुकाम यांशि.

प्रति नाव मुकाम कृतानेक आशीर्वाद् विनंती उपरी येथील कुशल तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों श्रीचे कृपेंकरून वर्तमान उत्तम असे विशेष मजकूर लिहिणे असेल तो त्याहावा सर्वदां पत्रद्वारें आनंदवित असावें बहुत काय लिहिणें लोभ असोंदीजे हे आशीर्वाद्.

## गृहस्थानें शास्त्रीयास.

वेद्शासंपन्न राजमान्य राजश्री नाव

विशेषण मुकाम स्वामीचे शेवेसि.

विद्यार्थी अथवा विद्योत्सुक नाव बिनाव आडनाव मुकाम कृतानेक साष्टांग नमस्कार् प्रणाम दंडवत विनंती येथील कुशल तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों आपले कृपेंकरून सर्वमंडळी क्षेमरूप असो विशेष मजकूर लिहिणे असेल तो त्याहावा सदैव आशीर्वाद् पत्र पाठवून सांभाळित अशिलें पाहिजे बहुत काय लिहिणें लोभ असोंद्यावा हे विनंती.

## शास्त्र्यानें शास्त्र्यास.

वेद् शास्त्रसंपन्नराजश्री नाव विशे

षण मुकाम यांशिप्रति

स्नेहाभिलाषी नाव आडनाव मुकाम साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो त्याहावा वरचेवर पत्र पाठवून संतोषवीत जावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

## शास्त्र्यानें गृहस्थास.

राजश्रीयाविराजित राजमान्य राज
श्री नाव विशेषण मुकाम यांप्रति

नाव मुकाम कृतवेदोक्त आशीर्वाद अथवा अनेक आशीर्वाद किंवा आशीर्वाद विनंती उपरि येथील क्षेम तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों सुखरूप असों विशेष मजकूर लिहिणें असेल तो त्याहावा सदैव पत्रद्वारें कुशलवृत्त लिहित असावें लोभ करावा हे आशीर्वाद.

## गृहस्थानें वैदिक आश्रितास.

वेदमूर्ति राजमान्य राजश्री नाव विशेषण मुका
म स्वामीचे शेवेशि.

विद्यार्थी नाव बिनाव आडनाव मुकाम साष्टांग नमस्कार प्रणाम दंडवत विनंती येथील कुशल तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों आपले आशीर्वादें करून वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो त्याहावा निरंतर पत्र पाठवून सांभाळि

असावें बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विज्ञापना.

## आश्रित ब्राह्मणानें गृहस्थास.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री नाव
विशेषण मुकाम यांशि.

प्रति नाव आडनाव मुकाम कृतानेक आशीर्वाद विनंती तागाइत महिना पक्ष तीथ पावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणे असेल तो लिहावा सर्वदा पत्र पाठवून परामृश घेत असावा बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

## गृहस्थानें सामान्य आश्रितास.

वेदमूर्ति राजश्री नाव विशेषण आड
नाव मुकाम स्वामींचे सेवेसि.

विद्यार्थी नाव बिनाव आडनाव मुकाम साष्टांग नमस्कार प्रणाम दंडवत विनंती येथील कुशल तागाईत महिना पक्ष तीथ पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणे असेल तो लिहावा वरचेवर पत्र पाठवून संतोषवित असावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

## सामान्य पक्षी आश्रितानें गृहस्थास.

राजश्रीयाविराजित राजमान्य राजश्री
नाव विशेषण मुकाम यांशि

आश्रित नाव आडनाव मुकाम आशीर्वाद किंवा नमस्कार वि विनंती येथील कुशल तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों सुखरूप असों विशेष मजकूर लिहिणे असेल तो ल्याहावा निरंतर पत्र पाठवून आश्रिताचा समाचार घेत असावा हे विनंती अथवा हे आशीर्वाद.

## कनिष्ठ पक्षी गृहस्थानें आश्रितास.

वेदमूर्तिराजश्री नाव आडनाव मुकाम स्वामीचे शेवेसि.

विद्यार्थी नाव बिनाव आडनाव मुकाम नमस्कार प्रणाम दंडवत विनंती उपरि येथील क्षेम तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वर्तमान उत्तम असे विशेष मजकूर लिहिणे असेल तो ल्याहावा निरंतर पत्रद्वारें सविस्तरवृत्त लिहित असावें बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

## आश्रितानें सामान्य पक्षि गृहस्थास.

राजश्री नाव विशेषण मुकाम याशि.

प्रति नाव मुकाम आशीर्वाद उपरि येथील क्षेम तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा सदोदित पत्र पाठवून आनंदवीत असावें बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

## सामान्य भिक्षुकानें यजमानास.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नाव

बिनाव आडनाव मुकाम यांसि.

प्रतिनाव मुकाम नमस्कार विनंती उपरि येथील क्षेम तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों स्वस्तिक्षेम असो विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा सार्वकाळ पत्रद्वारें संतोषवित जाणें बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती अथवा आशीर्वाद.

## गृहस्थानें गृहस्थास.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

नाव विशेषण मुकाम स्वामीचे सेवेसि

पोष्य नाव बिनाव आडनाव मुकाम कृतानेक साष्टांगनमस्कार अथवा प्रणाम विनंती येथील कुशल तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों आपले कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा निरंतर पत्र पाठवून संतोषवित असिलें पाहिजे बहुत काय लिहिणें लोभाची वृद्धि शुक्लचंद्रवत होत असावी हे विनंती.

## भिक्षुकब्राह्मणानें गृहस्थास.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नाव

विशेषण आडनाव मुकाम यांसि.

शुभचिंतक नाव मुकाम आशीर्वाद तागाईत महिना पक्ष तीथपा
वेतों आपलें कल्याण चिंतित क्षेमरूप असों विशेष मजकूर
लिहिणें असेलतो ल्याहावा वारंवार पत्र पाठउन सकल [illegible] लि
हित असावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

## गृहस्थानें भिक्षुकास.

वेदमूर्तिराजमान्य राजश्री नाथविशेष
णआडनाव स्वामीचे शेवेसि.

विद्यार्थीनाव बिनाव आडनाव मुकाम कृतानेक [illegible]
र विनंती येथील क्षेम तागाईत महिना पक्ष [illegible]
आशीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष [illegible]
तो ल्याहावा सदोदित पत्र येउन सांभाळ [illegible] बहुत का
य लिहिणे लोभ असावा हे विनंती.

## थोरपदवीचे गृहस्थानें मध्यम पदवीचे गृहस्थास.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नाव
विशेषण मुकाम स्वामीचे शेवेसि.

पोष्य नाव बिनाव आडनाव मुकाम साष्टांग नमस्कार प्रणाम वि
नंती उपरि येथील कुशळ तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वर्त
मान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहा
वा वरचेवर पत्र पाठवून संतोषवित जावें बहुत काय लिहिणें

लोभ करावा हे विनंती.

## थोरपदवीचे गृहस्थानें कनिष्ठ पदवीचे गृहस्थास.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नाव

विनाव आडनाव स्वामीचे सेवेसि.

पोष्यांकित नाव विनाव मुकाम साष्टांग नमस्कार अथवा प्रणाम विनंती उपरि येथील कुशळ तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा व स्वेवर पत्र पाठवीत असावें बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

## थोर थोर राज्याधिकारी यांस गृहस्थ लोकांनीं.

श्रीमंत प्रौढ प्रताप शौर्योदार्याद्यनेक गु

णविराजित गोब्राह्मण प्रतिपालक नि

राधारी यांसि आधार महाराज नाव वि

शेषण साहेबांचे सेवेसि.

सेवकांतर्गत नाव विनाव आडनाव कृतानेक विज्ञापना तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें वृत्त यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा निरंतर आज्ञोत्तर येऊन सेवकाचा संभाळ व्हावा सेवेसि वि

दित होय हे विज्ञापना.

## योग्यतेच्चे मराठ्यास गृहस्थानें.

राजश्री नाव विशेषण आडनाव मु

काम गोसावी यांसि.

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य

स्नेहांकित अथवा स्नेहोत्सुक नाव बिनाव आडनाव मुकाम आ
शीर्वाद राम राम विनंती येथील कुशळ तागाईत महिना पक्ष तीथ
पावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल
तो ल्याहावा सदैव पत्र द्वारें संतोषवीत असावें बहुत काय लिहि
णें लोभ असों दीजे हे विनंती.

## मराठ्यानें गृहस्थास.

राजश्री नाव विशेषण आडनाव

मुकाम गोसावी यांसि.

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य

स्नेहांकित नाव बिनाव आडनाव मुकाम कृतानेक दंडवत किंवा रा
मराम विनंती येथील कुशळ तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों आप
ले कृपें करून वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें अ
सल तो ल्याहावा वरचेवर पत्र पाठवून संतोषवीत असावें बहुत का

य लिहिणें लोभ असों द्यावा हे विनंती.

## सामान्य पक्षी मराठ्यानें सामान्य पक्षी गृहस्थास.

राजश्री नाव विशेषण मुकाम
गोसावीयांसि.

स्नेहांकित नाव विनाव आडनाव मुकाम दंडवत विनंती येथील कुशळ तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वर्तमा न उत्तम असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो त्याहावा वरचेवर पत्र पाठवून संतोषवीत जावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

## गृहस्थानें सामान्य पक्षी मराठ्यास.

राजश्री नाव विशेषण आड
नाव मुकाम गोसावीयांसि.

स्नेहांकित नाव विनाक आडनाव मुकाम आशीर्वाद किंवा रामराम विनंती येथील कुशळ तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो त्याहावा सर्वदा पत्र पाठवून सविस्तर लिहित अ-

सावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती किंवा आशीर्वाद.

## कुणिबिपशीं मराठा अथवा लेंकवळा यासि.

राजश्री नाव बिनाव आडनाव यांसि नाव बिनाव आड नाव मुकाम आशीर्वाद किंवा रामराम विनंती उपरि मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा वरचेवर पत्र पाठवीत जाणें लोभ कीजे हे आशीर्वाद किंवा हे विनंती.

## भिक्षुक ब्राह्मणास ब्राह्मणा खेरीज जातीनीं.

वेदमूर्तिराजमान्यराजश्री नाव विशेषण
आडनाव स्वामीचे शेवेसि

आज्ञाधारक किंवा सेवापरायण नाव बिनाव आडनाव मुकाम दोनी कर जोडन दंडवत किंवा प्रणाम विनंती येथील क्षेम तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों आपले कृपें करून अथवा आपले आशीर्वादें करून सुखरूप असों विशेष मजकूर लिहिणें असेल तो लिहावा सदोदित पत्र पाठवून सांभाळ केला पाहिजे बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

## थोरपदवीच्याने हलके पदवीच्यास.

राजश्री लिहिणाराचें नाव बिनाव आडनाव ताहां ज्यास त्या
हावयाचें त्याचें नाव बिनाव आडनाव मुकाम मजकूर लिहि
णे असेल तो त्याहावा मिति महिना पक्ष तीथ शक संवत्सर

## सेवकानें धन्यास.

शेवेसि विनंती सेवक नाव बिनाव आडनाव मुकाम शिरसाष्टांग न
मस्कार अथवा प्रणाम दंडवत विज्ञापना तागाईत महिना पक्ष
तीथ पावेतों स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित अ
से विशेष मजकूर लिहिणें असेल तो त्याहावा सर्वदां पत्रद्वारें
सेवकाचा सांभाळ करीत असिलें पाहिजे शेवेसि विदित होय
हे विज्ञापना.

## धन्यानें सेवकास.

प्रेमयुक्त नाव बिनाव आडनाव मुकाम नमस्कार अथवा रामराम
विनंती उपरि मजकूर लिहिणे असेल तो त्याहावा वारंवार पत्र पाठ
वून सविस्तर लिहित जाणें बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती
वाना महिना पक्ष तीथ शक संवत्सर या पद्धतीनें लिहून लखो
टयावर सेवकाचें नाव त्याहावें.

## जी सुवासीन बायको थोरपदवीची आहे तिजला परकी गृहस्थानें.

सौभाग्यवती कज्जचूडे मंडित नाव विशेषण आडनाव मुकाम यांसि.

प्रति नाव बिनाव आडनाव मुकाम नमस्कार प्रणाम दंडवतआशीर्वाद विनंती येथील कुशाळ तागाईत महिना पक्ष तीथपावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणे असेल तो ल्याहावा सदैव पत्र पाठवून चित्त आनंदवित असावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती किंवा आशीर्वाद

## सुवासीन बायको थोर पदवीची तिजला गृहस्थानें ल्याहावें.

श्रीमंत सकळ सौभाग्यादि संपन्न वज्रचूडे मंडित नाव विशेषण यांसि.

प्रतिनाव बिनाव आडनाव मुकाम कृतानेक साष्टांग नमस्कार प्रणाम दंडवत आशीर्वाद विनंती येथील कुशाळ तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों आपले कृपें करून वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणे असेल तो ल्याहावा सदोदित

पत्रद्वारें कुशल लिहून आनंदवीत असिलें पाहिजे बहुत कायलि हिणें लोभाचीवृद्धि असावी हे विनंती.

## सामान्यपदवीचे सुवासिनी बायकोस परकीगृहस्थाने लिहावें.

सौभाग्यवती नाव विशेषण मुकाम यांसि.

प्रतिनाव विनाव आडनाव मुकाम कृतानेक साष्टांग नमस्कार प्रणाम दंडवत विनंती येथील कुशल तागाईत महिना पक्ष तीथपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेलतो ल्याहावा निरंतर पत्र पाठवून संतोषवीतजावें बहुत कायलिहिणें लोभकरावा हे विनंती किंवा आशीर्वाद.

## थोरपदवीचे विधवेस.

श्रीमंत गंगाजळ निर्मळ मातुश्री नाव विशेषण यांसि

प्रतिनाव विनाव आडनाव मुकाम कृतानेक साष्टांग नमस्कार अथवा आशीर्वाद प्रणाम दंडवत विनंती येथील कुशल तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों आपले कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेलतो लिहावा सदैव पत्रपाठवून संतोष

वीत असिलें पाहिजे अथवा सांभाळ केला पाहिजे बहुत काय लिहि णें लोभ असोंद्यावा हे विनंती किंवा आशीर्वाद.

## मध्यम पक्षी विधवा स्त्रियांस.

गंगाभागीरथी समान नाव विशेषण आडनाव
मुकाम यांसि.

प्रतिनाव विनाव आडनाव नमस्कार प्रणाम दंडवत आशीर्वाद वि नंती येथील कुशळ तागाईत महिना पक्ष तीथ पर्यंत वर्तमान यथा स्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा निरंतर पत्र पाठवून आनंदवीत जावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

## कनिष्ठ पक्षीं विधवा स्त्रियांस.

गंगाभागीरथी नाव विशेषण आडनाव मुका म यांसि

प्रति नाव विनाव आडनाव मुकाम साष्टांग नमस्कार प्रणा म दंडवत आशीर्वाद विनंती उपरि येथील क्षेम तागाईत महि ना पक्ष तीथ पर्यंत वर्तमान यथास्थीत असे विशेष मजकर असेल तो ल्याहावा वरचेवर पत्र पाठवून सविस्तर वृत्त लिहित जावें बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद हे विनंती.

## मराठ्यानें किंवा वाण्यानें गृहस्थ ब्राह्मणास लिहावें.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री
नाव विशेषण मुकाम गोसावी यांसि.

स्नेहांकित अथवा सेवक नाव आडनाव मुकाम कृतानेक दंडवत किंवा रामराम विनंती येथील कुशल तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों आपले कृपेंकरून वर्तमान यथास्थित असें विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा निरंतर पत्रद्वारें आनंदवीत असावें बहुत काय लिहिणें लोभ असो द्यावा हे विनंती.

## कुमारी ह्मणजे ज्या कन्येचें लग्न जालें नाहीं तिजला बापानें अथवा आजा, काका, मामा, व[illegible] यांणी लिहिणें तर.

चिरंजीव नाव मुकाम यांसि प्रति नाव त्रिनाव आडनाव मुकाम आशीर्वाद उपरि येथील क्षेम तागाईत महिना पक्ष तीथ पर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असे

लतो त्याहावा वरचेवर पत्र पाठवून सविस्तर वृत्त लिहितजाणें बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

## कुमारिकेस परक्यानें लिहिणें तर.

अमुक गृहस्थाची कन्या कुमारिका नाव मुकाम यांसि नाव-बिनाव आडनाव मुकाम आशीर्वाद उपरि येथील क्षेम तागाईत महिना पक्ष तीथ पर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो त्याहावा सर्वदा पत्रद्वारें संतोषवीत जाणें बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

## गुजराथीवाणी किंवा गुजर भाट्येयास.

राजमान्यराजश्री नाव विशेषण
मुकाम गोसावीयांसि.

स्नेहांकित किंवा स्नेहाभिलाषी नाव बिनाव मुकाम जय गोपाळ जयकृष्ण विनंती येथील कुशळ तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणे असेल तो त्याहावा वरचेवर पत्र पाठवून समाचार घेतजाया बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

# हुंडीपत्र लिहिणें तर.

स्वस्तिश्री महाशुभस्थानें राजमान्य
राजश्री नाव बिनाव आडनाव पेंठ
अगर गांव किंवा बंदर यांसि अम
के शाहराहून

नाव बिनाव आडनाव नमस्कार रामराम जयगोपाळ विनंती उपरि आतां तुह्मावर हुंडी केली १ येथें राखले राजश्री नाव बिनाव आडनाव अमके गांवीं राहणार याजपासून घेतले रुपये ५०० अमुक चलनी याची दुगुणी १००० एकहजार याचे निमें अमुक रुपये हुंडी पावल्या वर मुदत केली असेल ते रोज अमुक तितक्या रोजाचे निमें निमें अंक दोनस्थळीं घालावे उपरनामें शाहाजोग ठाव ठिकाणा चौकशी करून धणी याचे नावें कबज घेउन रुपये सदरहू चलनी अथवा हर कोणते चलनी पुरे दीजे लिहिली मिती महिना पक्ष तीथ शक संवत्सर चालते ओळी सुद्धां ओळी अमुक आंकडा.

## कुणबीण अथवा बदागुलाम यांस सोडणें तर थ

## त्यानें त्यांस सोड पत्र द्या वें तें.

सोड पत्र शाके अमुक संवत्सर महिना पक्ष तीथ वार ते दिवशीं ज्या मनुष्यास सोड देणें असेल त्याचें नाव यासि लिहून देणाराचें नाव बिनाव आडनाव मुकाम तुजला सोडपत्र लिहून देण्यास कारण कीं तुजला काम काज होत नाहीं सबब अगर दुसरी कोणती सबब असेल ती लाऊन तुजला तुजला आह्मी स्वसंतोषें करून कांहीं तुजकडून न घेतां अथवा अमुक रुपये घेऊन सोड दिल्ही असे तुझे इछेस येईल तेथें जाणें आमचा वारसा अर्थाअर्थीं तुजकडे कांहीं एक राहिला नाहीं हें सोडपत्र लिहून दिल्हें सई दस्तुर लिहिणाराचें नाव बिनाव आडनाव मुकाम अथवा मालकानें स्वदस्तुर लिहिलें असल्यास दस्तुर खुद ह्मणोन ल्याहावें.

सई धन्याची.

साक्षी एक असूं नये जाजती असावे.

## वेव्हारी पावती देण्या घेण्याची

राजश्री नाव बिनाव आडनाव मुकाम यांसि.

पावती बेशमी नाव बिनाव आडनाव मुकाम कारणें लिहू न देतों पावती अशी कीं पावती देण्याघेण्याचे मजकुराचा संबंध जसा लिहिणें असेल तसा लिहावा तुह्मी आह्मास अमुक रुपये किंवा अमुक सोन्या रुप्याचा दागिना अथवा अमुक जिनस आह्मी भरून पावलों मिती महिना पक्ष तीथ शक संवत्सर दस्तुर लिहिणाराचें नाव बिनाव आडना व मुकाम अथवा मालकानें स्वदस्तुर लिहिली असल्यास द स्तुर खुद असें लिहावें

सही मालकाची
अथवा निशाणी

साक्षी एक असूनये
जाजती असावे.

पावती लिहिण्याचा दुसरा शिरस्ता असा कीं पावती ज्या स लिहून देतो त्यास सला मालकीचें जसें पत्र लिहावयाचें त्याचप्रमाणें विनंती विशेष किंवा विज्ञापना विशेष पर्यंत लि हून ज्याविव्हारीं ज्यासबबेनें पावती देतो तो मजकूर सर्व लिहू न रुपये किंवा अमुक कांहीं तुह्मी आह्मास दिल्हे ते आह्मी भरून पावलों असें लिहून नंतर मिती महिना पक्ष तीथ श क संवत्सर बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती किंवा

हे विज्ञापना हा शिरस्ता जो पतीवान् गृहस्थ ज्याचे हातून खोटसाळ वेव्हार होणार नाहीं किंवा संभावीत योग्य तेचा गृहस्थ त्याची पावती घ्यावी जो पतीवान् त्याचे शायदीचें ही प्रयोजन पडत नाहीं परंतु काळ परत्वें सदरीचे शिरस्त्यानें पावती द्यावी घ्यावी हे उत्तम.

## फारखत लिहून देण्या घेण्या चा शिरस्ता.

राजश्री नाव बिनाव आडनाव मुकाम
यांसि.

फारखत बेशमा नाव बिनाव आडनाव मुकाम कारणें लिहून दिल्ही फारखत ऐसीकीं ज्या कारणानें फारखत देणें घेणें त्या मजकुरचा जसा संबंध लिहिणे असेल तो लिहून तुमचा आमचा देण्याघेण्याचा हिशेब आज दिवस पर्यंत किंवा अमके दिवस पर्यंत चुकऊन घेऊन तुह्मासही फारखत आह्मी आपले अकलहुशारीनें व खुष रजावंदीनें लिहून दिल्हें असें तुमचा आमचा याहिशेबा संबधें कांहीं एक तंटा राहिला नाहीं तुह्मा आह्मा उभयतांजवळ या व्यवहार संबंधें कागदपत्र निघाल्यास रद्द असेत मिती महिना पक्ष तीथ वार शक संवत्सर लिहिणाराचेंनाव बिनाव आडनाव मुकाम अथवा मालकानें आपण लिहिलें

असल्यास दस्तुर खुद ह्मणोन त्याहावें

लिहून देणार मालकाची
सई अथवा निशाणी.

साक्षी दोन असावे

## कर्जखत लिहून देण्याघेण्याचा शिरस्ता

कर्जखत शक अमुक संवत्सर महिना तीथ वार तारीख महिना सन ते दिवसी खत लिखिते धनकोनाम राजश्री नाव बिनाव आडनाव मुकाम यासि रिणकोनाम नाव बिनाव आडनाव मुकाम आह्मी तुह्मापासून अमुक कारणास्तव घेतले कर्ज अमुक चलनी मुद्दल रुपये अंकीं अक्षरीं अमुक यासि व्याज दरमाहे दर शेकडा रुपये अमुक प्रमाणें करार केला असे आजपासून अमुक दिवसांनीं किंवा अमुक महिन्यानीं अथवा अमुक वर्षांनीं व्याजमुद्दलसुद्धां एकंदर रुपयांचा उलगडा करून देऊं हे रुपये देशीं परदेशीं कांहीं एकत पत्रील न सांगतां देऊं यासि अंतर करणार नाहीं हें खत आह्मी आपले अकलहुशारीनें व खुषरजावंदीनें लिहून दिल्हें सही दस्तुर लिहिणारानें नाव बिनाव आडनाव मुकाम किंवा कर्ज घेणार मालकानेंच लिहिलें असलें तर दस्तुर खुद्द

से लिहावें

सहीखत लिहून देणार माल
काची किंवा निशाणी

साक्षी दोन पासून जास्त अ
सावे एक असूं नये.

कर्ज रुपये घेतले त्याची फेड होण्यासत्व हाप्ते लाऊन द्याव याचे घ्यावयाचे किंवा सावकाराजवळ दागिना अथवा कां ही इष्टेट गाहाण ठेवून रुपये द्यावयाचे घ्यावयाचे त्यास किं वा जामीन देऊन सावकारास खत करून द्यावयाचे त्याचे शिरस्त दोन प्रकारचे आहेत परंतु मुख्यत्वे करून गाहाण किंवा हप्ते अथवा जामीन हे तिनी प्रकारचे लेख कर्जाचे पो टचे आहेत तेव्हां कर्ज खत लिहून त्यांत तिनी तून कोणता प्रकार लिहिणें असेल तो त्याहावा ते तीन प्रकार खालीं प्र सिद्ध लिहिले आहेत.

## हप्तेबंदी खत लिहिण्याचा शिरस्ता

कर्जखत शक संवत्सर महिना पक्ष तीथ वार इंग्रेजी तारी ख महिना इसवी सन ते दिवशीं खत लिखिते धनकोनाम रा जश्री नाव बिनाव आडनाव मुकाम यांसि रिणको नाम ना

व बिनाव आडनाव मुकाम आह्मी तुह्मापासून अमुकग रजेसव घेतले कर्ज मुद्दल अमुकचलनी रुपये अंके अमुक अक्षरीं अमुक यासि व्याज दर माहे दर सदे रुपये अमुक प्रमाणें करार केला असे या रुपयांची फेड हप्तेबंदी येणें प्रमाणें.

अंक अमुक महिन्यांत अमके तारखेस अमुकसनांत अमुक रुपये देऊं.

अंक अमुकमहिन्यांत अमके तारखेस अमुक सनांत अमुक रुपये देऊं.

सदरीं अमुक हप्ते लिहिले आहेत याप्रमाणें दरमाहांचे दरमाहा रुपयांचा उलगडा करून एकंदर तुमचे रुपयांची फेड करूं यासि अंतर करणार हे रुपये देशीं परदेशीं कांहींएक तपशील न सांगतां फड न्याकरून देऊं हें खत आह्मी आपले अकल हुशारीनें व खुषरजावंदीनें लिहून दिल्हें सही दस्तुर लिहिणारांचें नाव बिनाव आडनाव मुकाम मालकानें लिहिलें असल्यास दस्तुर खुद ल्याहावें

मालकाची सही अथवा निशाणी

साक्षी दोनतरी असावे.

## गाहाणखत लिहिण्याचा शिरस्ता.

कर्जखत शके संवत्सर महिना पक्ष तीथ ते दिवशीं खत लिखिते धनकोनाम राजश्री नाव बिनाव आडनाव मुकाम या सिरिणकोनाम नाव बिनाव आडनाव मुकाम आह्मी तुह्मापासून अमुक कारणास्तव घेतले कर्ज अमुकचलनी सुद्दल रुपये अंकें अक्षरीं अमुक याशि व्याज दरमाहे दरसदे रुपये अमुक प्रमाणें करार करून घेतले असत सदरहु रुपयांस तारण गाहाण सोन्याचा अथवा रुप्याचा अमुक दागिना वज्जन तोळे अमुक अथवा घर शेतवाडी हर कोणतें गाहाण देणें असेल तें वज्जन माप सुमार मोजदादवार लिहावें हें तुह्मांजवळ गाहाण ठेविलें असे तुमचे रुपयांचा व्याजसुद्धां उलगडा करूं तेसमई आपला गाहाण ऐवज सोडवून घेऊं मुदत करणें असल्यास त्याहावी हें खत आह्मी आपले अकलहुशारीनें वखुषरजावंदीनें लिहून दिल्हें सई

सई खत लिहून देणार
मालकाची किंवा निशाणी

साक्ष एक असूनये दोन पा
सून ज्याजती असावे.

इस्ताहार अथवा विकलम.

## जामीनखत लिहून घेण्यादेण्याचा शिरस्ता.

कर्जखत शक संवत्सर महिना पक्ष तीथ ते दिवसीं खत लिखि ते धनकोनाम राजश्री नाव बिनाव आडनाव मुकाम यांशी रिणकोनाम नाव बिनाव आडनाव मुकाम आह्मी तुह्मापासून आपले आत्मकार्याकारणे घेतले कर्ज मुद्दल रुपये अंके अमुक अक्षरीं अमुक याशि व्याज दरमाहे दर शेंकडा रुपये अमुकप्रमाणें करार केला असे आजपासून अमके मुदतीस व्याज व मुद्दल एकंदर रुपयांचा उलगडा देशीं परदेशीं कांहींएक तपशील नसांगतां करून देऊं याशि अंतर होणार नाहीं हें खत आह्मी आपले अकलहुशारीनें व खुषरजावंदीनें लिहून दिल्हे सई सदरहू रुपयांस जामीन धनी नाव बिनाव आडनाव मुकाम तुह्मापासून राजश्री नाव बिनाव आडनाव यांणीं आमचे विद्यमानें कर्ज घेऊन हें खत लिहून दिल्हें आहे त्याप्रमाणें मुदतीस म

णार निले तुमचे रुपयांचा उलगडा करतील त्यांणी नकेस्यास मुदतीपुढें त्यांचा उजुर नधरितां व कांहीं एक तपशील नसांगतां देशीं परदेशीं व्याजसुद्धां सदरहूं रुपयांचा खुद आह्मी फडशा करून देऊं हें जामीनखत आलाहिदा निराळें लिहून दिल्या दाखल आह्मी आपले अकल हुशारीनें व खुषरजावंदीनें तुह्मास लिहून दिल्हें असे मिती महिना पक्ष तीथ वार शक संवत्सर मजकूर दस्तुर लिहिणाराचें नाव बिनाम आडनाव.

सई रुपये घेणाराची:

सईजामीन राहाणाराची

साक्षी दोन असावे अथवा जाजती असावे.

## राजीनामा पंचास किंवा जाती गोतांत लिहून देण्या घेण्याचा शिरस्ता.

राजश्री पंचाची नावें बिनावें आडनावें मुक्काम जाती गोतांत देणार तर प्रमुख कोण असेल त्याचें नाव अगोधर लिहून मागाहून अनुक्रमानें नावें जसीं लिहिणें असतील तसीं ल्याहावीं समस्त गोत गंगायासि.

बिकलम नाव बिनाव आडनाव मुकाम.

राजीनामा बेशमी नाव बिनाव आडनाव मुकाम कारणे लिहून देतों राजीनामा ऐसाजे नंतर आपला मजकूर कोणता कसा लिहिणें असेल तो संगतवार लिहून नंतर ये विशींचा वास्तवीक निर्णय करून तुह्मी पंच अथवा गोतगंगा मला ज्याप्रमाणें वर्तणुक करावयास सांगाल त्याप्रमाणें मी करीन जरकरितां मजकडून नव दिगर होईल तर पंचाचा खोटा अथवा जातीचा खोटा हा राजीनामा मी आपलेअकलहुशारीनें व खुषरजावंदीनें लिहून दिल्हा असे मिती महिना पक्ष तीथ शाक संवत्सर दस्तुर लिहिणाराचें नाव बिनाव आडनाव मुकाम राजीनामा देणारानेंच लिहिलें तर दस्तुर खुद असें ल्याहावें.

राजीनामा देणाराची सई

साक्षी दोन किंवा जाजती असावे.

## करारपत्र ल्याहावयाचा शिरस्ता.

करारपत्र शकसंवत्सर महिना पक्ष तीथ वार ते दिवसीं राजश्री नाव बिनाव आडनाव मुकाम यासि नाव बिनाव आडनाव मुकाम कारणें करारपत्र आह्मी तुह्मांस लिहून देतों ऐसें कीं जो करार उभयतांचा असेल तसा संगतवार ल्याहावा नंतर याप्रमाणें तुमचा आमचा करार ठरून हें पत्र तुह्मास आह्मी स्वसंतोषें लिहून दिल्हें असे यांत आह्मांस

डून तफावत पडल्यास नुकसानीची अटक लिहून देण्या घेण्याची असेलती ती ल्याहावी हें करारपत्र लिहून दिल्हें सही दस्तुर लिहिणाराचें नाव बिनाव आडनाव

सईकरारपत्र देणाराची

साक्षी एकपेक्षाजाजती
असावे.

## साटेपत्र लिहिण्याचा शिरस्ता.

राजश्री नाव बिनाव आडनाव मुकाम गोसावी यांसि-

स्नेहांकित नाव बिनाव आडनाव मुकाम रामराम जयगोपाळ विनंती विशेष तुमचा अमुक माल केली किंवा वजनी किंवा सुमारीं अथवा नग यामाला विशीं तुमचें आमचें बोलणें होऊन साटें नकी अमुक रुपयांस ठरलें असे त्यास तो माल तुह्मी आमचे पदरीं मोजदाद करून घातल्यावर अमुक मुदतीस किंवा रोख रुपये तुमचे पदरीं आह्मी घालावे या प्रमाणें करार ठरून हाल्लीं साटें सई करण्या बद्दल सदहू ठराव पैकीं इसार रुपये अमुक तुमचे पदरीं आह्मी घातले आहेत याउपरि बंदर भावामुळें दरदाम जास्त जाला तर तोटा नफा आमचा तुह्मास त्यामाला विशीचें जडजोखीव दरदामाकडून कांहीं एक नाहीं. कदाचित् करारांत आह्मी तुह्मासी पडमुर जाऊं तर सा

टें सई करण्या बद्दल रुपये सदरहू तुह्मास आह्मी दिल्हे आहेत ते रुपये तुह्मी आह्मास परत देऊं नये हें साटेपत्र आह्मी आपले अकलहुशारीनें वखुषरजावंदीनें लिहून दिल्हें सई दस्तुर लिहिणाराचें नाव बिनाव आडनाव मुकाम मालकानेंच लिहिलें असल्यास दस्तुरखुद असें ल्याहावें.

सही मालकाची अथवा निशाणी.

साक्षी एक असूं नये जास्त
असावे.

## खरेदी पत्र देण्याघेण्याचा शिरस्ता.

खरेदी पत्र शके अमुक संवत्सर महिना पक्ष तीथ वार ते दिवशीं नाव बिनाव आडनाव मुकाम यांसि नाव बिनाव आडनाव मुकाम कारणें खरेदी पत्र तुह्मास आह्मी लिहून देतों असें कीं आमचा खुद अमुकमाल केली किंवा वजनी अथवा सुमारी जो असेल तो लाऊन अमुक रुपयांस स्वसंतोषें करून तुह्मांस आह्मी खरेदी दिल्हा आहे याज बद्दल आमचा वाली वारस. अथवा हर कोणी हिल्ला हरकत तुह्मास करील तर त्याचा जबाब आह्मी खुद करूं तुह्मास त्याविशींचा तिळमात्र उपसर्ग लागू देणार नाहीं हें खरेदी पत्र आह्मी आपले अकलहुशारीनें वखुषरजावंदीनें लिहून दिल्हें सई दस्तुर लिहि

णाराचें नाव बिनाव आडनाव मुकाम अथवा मालकानेंच लिहि लें तर दस्तुर खुद असें ल्याहावें

सही मालकाची अथवा निशाणी

साक्ष एकापेक्षां जास्त असावे.

## हातेबंदी खत करून देणें घेणें तर.

हातेबंदी खत शक संवत्सर महिना पक्ष तीथ वार ते दिवसीं खत लिखिते धनकोनाम राजश्री नाव बिनाव आडनाव मुकाम याशि रिणकोनाम नाव बिनाव आडनाव मुकाम आह्मी तुह्मापासून घेतलेकर्ज अमुक चलनी रुपये अंके अमुक अक्षरी अमुक यासि हातेबंदी

अंक अमुक शकांत अमुक महिन्याचे अमके तिथीस अथवा अमुक सनांतील अमुक महिन्याचे अमके तारखेस अमुक रुपये देऊं.

अंक अमुक शकांत अमके महिन्याचे अमके तिथीस अथवा अमके सनांत अमुक महिन्याचे अमके तारखेस अमुक रुपये देऊं

सदरीं लिहिले प्रमाणें अमुक हात्यांनीं तुमचे एकंदर रुपयांचा उलगडा करून देऊं कदाचित् हाता चुकल्यास त्या हात्याचे राहिले रुपयांस

व्याज अमुक प्रमाणें जाहले मुदतीस फडशा करून देऊं यासि अंतर होणार नाहीं हे रुपये देशीं परदेशीं कांहीं एक तपशील न सांगतां फडशा करून देऊं यासि अंतर करणार नाहीं हें हातखंदी खत आम्ही आपले अकल हुशारीनें व खुष रजावंदीनें लिहून दिल्हें सई दस्तुर लिहिणाराचें नाव विनाव आडनाव मुकाम अथवा मालकानेंच लिहिलें असल्यास दस्तुर खुद असें ल्याहावें.

सई मालकाची अथवा निशाणी.

साक्षी एकापेक्षा जास्त

असावे

## वायदे रोखा लिहून देण्या घेण्याचा शिरस्ता.

वायदा रोखा शक संवत्सर महिना पक्ष तीथवार ते दिवशीं खत लिहिते धनकोनाम राजश्री नाव विनाव आडनाव मुकाम यासि रिणकोनाम नाव विनाव आडनाव मुकाम आह्मी तुह्मापासून अमुक शकांत अमुक महिन्यांत अमके तिथीस अमुक रुपये कर्ज घेतले त्याची मुदत केली होती ती आमचे नातवानीमुळें अथवा अमुक कारणामुळें मुदत चुकली हाल्ली तुमचे देण्याची निकड आणि आमचे हाताजवळ पैसा नाहीं याज करितां तुह्माजवळ मुदत मागून घेऊन हा वायदे रोखा लिहून देतों कीं आजपासून अमुक महिन्यानीं अथवा अमु

क. दिवसांनीं तुमचे एकंदर रुपयांचा उलगडा करून द्यावा यद्देरोखा परत घेऊं यासि अंतर होणार नाहीं हा वायदे रोखा आह्मी आपले अकल हुशारीनें व खुष रजावंदीनें लिहून दिल्हा सई दस्तुर लिहिणाराचें नाव बिनाव आडनाव मुकाम मालकानेंच लिहिलें असल्यास दस्तुर खुद असें ह्मणावें.

सई मालकाची अथवा निशाणी.

साक्षी एकापेक्षां जास्त

तीअसावे.

## वैरागीयास लिहिण्याचा.

श्रीसीताराम भजनीय वैराग्य भरित नाव दास बावा यां प्रती नाव बिनाव आडनाव मुकाम कृतानेक जयसीताराम विज्ञापना विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा. निरंतर पत्र पाठवून संतोषवीत असावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती अथवा हे विज्ञापना मिति महिना पक्ष तीथ शाक संवत्सर.

## गोसांवी यांस लिहिण्याचा.

सकळ वैराग्यसंपन्न तपोनिधी नाव बावा गिरी अथवा पुरी किंवा

भारती यांप्रती नाव बिनाव आडनाव याचे कृतानेक नारायण विनंती विज्ञापना विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा निरंतर पत्र पाठऊन आनंदवीत असावें हे विनंती मिती महिना पक्ष तीथ शाक संवत्सर.

## कानडे वाणीयांणी परस्परांस.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री
नाव विशेषण मुकाम स्वामी गोसांवी यांसि.

स्नेहांकित नाव बिनाव आडनाव मुकाम शरणशरणार्थ विनंती येथील कुशळ तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा निरंतर पत्र पाठवून कुशळवृत्त लिहीत असावें बहुत काय लिहिणें कृपालोभ करावा हे विनंती.

## जैनानी जैनास लिहिण्याचा शिरस्ता.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री
नाव विशेषण गोसावी यांसि.

स्नेहांकित नाव विनाव आडनाव मुकाम कृतानेक शिव शरणार्थ वि नंती उपरी येथील कुशळ तागाईत महिना पक्ष तीथ पावेतों सुखरू प असों विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा सदैव पत्र पा ठवून सविस्तर कुशळवृत्त लिहितजावें बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंती.

## लग्नपत्रिका लिहिण्याचा शिरस्ता.

ब्राह्मणाद्य करून सर्वजातीनीं परस्परें लग्नपत्र लिहिणें जाहाल्या स शिरस्त्यानें माना विशेष पर्यंत लिहून चिरंजीव नाव अथवा कन्ये चें नाव किंवा आप्त स्वकीयांचा किंवा परकीयाचा पुत्र अथवा कन्ये चें नाव लिहून याचें अथवा इचें लग्न अमुक महिन्यांत अमुक ति थीस अमकेवारीं दिवा अमुक घटकेचें किंवा रात्री अमुक घटकेचें किंवा गोरज योजना केली आहे शरीर संबंध अमुकाची कन्या व धू नेमस्त केली आहे किंवा अमुकाचा पुत्र वर निश्चय केला आहे तरि आपण सह परिवार येऊन कार्य संपादन केलें पाहिजे याप्रमा णें लिहून शिरस्त्या अन्वयें पुरतें करावें मिती महिना पक्ष तीथ श क संवत्सर.

## व्रतबंधपत्राचा शिरस्ता.

ब्राह्मणाद्य जातींनीं एकमेकांस परस्पर व्रतबंध पत्रिका लिहिणें तर विनंती विशेष किंवा विज्ञापना विशेष पर्यंत आपल्ले लिहिण्याचे शिरस्त्यानें लिहून नंतर चिरंजीव नाव याचा अथवा अमुकाचे पुत्राचा व्रतबंध अमुक महिन्यांत शुक्लपक्षीं किंवा कृष्णपक्षीं अमुक तिथीस अमुकवारीं अमके घटकेचा निश्चय केला आहे तरि आपण सह कुटुंब सह परिवार येऊन कार्यसिद्धि केली पाहिजे अथवा मंडप शोभिवंत केला पाहिजे या प्रमाणें लिहून शिरस्त्या अन्वयें पुरतें करावें नंतर महिना पक्ष तीथ शक संवत्सर लिहावा.

## संन्यासी याणें गृहस्थास.

श्रीमत् परमहंस इत्यादि विशेषणें जीं
त्याहावयाचीं तीं सदरीं लिहून नंतर
स्वामीचें नाव.

गृहस्थाश्रमामाजी निरंतर सत्कर्माचरणीरत राजमान्य राजश्री नाव बिनाव आडनाव मुकाम याशि आज्ञा केली ऐसीजे मजकूर लिहिणें असेल तो त्याहावा सुत्तापति विशेषात्कारें लिहून कळवावें असें नाहीं सदोदित पत्र द्वारें आनंदवृत्त लिहित जाणें इति ना

रायण स्मरणी

## पुरुषानें आपले स्त्रीस.

### आर्यागीतिकाछंद.

समयीं प्रसंग पडला भार्येप्रति पत्र हो तिचा चिवरें ॥ कयण्या पद्धति लिहिजे विशेषणें कोणत्या कसें नवरें ॥१॥ हा प्रश्न ऐकतांचीगुरु बोले शास्त्र उक्ति हे नाहीं ॥ अथवा आयकिला म्या प्रिय युग्माचा न लेखकानाहीं ॥२॥

### श्लोक.

वरानें पत्र लिहिणें जायेतें पद्धती नव्हे ॥ शास्त्रोक्ती हि नसे याला करावी कें वियोजना ॥१॥ पुराणीं शोधितां याचा आधार म्ज लागला ॥ तो तों प्रसिद्ध सर्वांतें ठउका पारखे बोलतों ॥२॥ त्रेतायुगीं राम भार्या हरिली रावणें सिता ॥ तिचे वियोग दुःखानें श्रीराम बहु विव्हळे ॥३॥ तेव्हां त्यास नई राम वृक्ष पाषाण आदितें ॥ आलिंगिले महा दुःखें सीते सीते ह्मणोनियां ॥४॥ तयाधारें चि लिहितों खालीं हे युग्म मायने ॥ यदर्थी सज्जनी मातें कोणी दोष न ठेविजे ॥५॥

## पुरुषानें स्त्रीस लिहिणें.

वज्रचूडे मंडित सौभाग्यवती मत्प्राणिस भार्या इजप्रति भर्त्ता नाव आउ

नाव कृत आशीर्वाद उपरि येथील कुशल तागाईत मास पक्ष तीथ वार पावेतों यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्या हावा तुजकडुन पत्र येऊन कुशलवृत्त कळतजावें हे आशीर्वाद.

आशीर्वाद तागाईत मास पक्ष तीथवार पावेतों सुखरूप आहों विशेष मजकूर लिहिणें असेलतो ल्याहावा तेथून पत्र येऊन वर्तमान समजावितजाणें हे आशीर्वाद. याप्रमाणें पत्र लिहून लखोट्यावर सौभाग्यवती पत्नीचें नाव घालावें.

## स्त्रीनें भ्रताराम लिहावयाचा माना.

श्लोक.

भर्त्याचें नाम याबाचे वदतां लाजवाटते ।। पुनर्जनप्रवृत्ती तीनाम घेऊं नये अशी ।।१।। प्रसंग आजि पडिला पत्रस्थ लिहिणें असा।। तरि आतां अशालागीं करावी युक्ति न्याकशी ।।२।। प्रवासी पुत्र वा कन्या नाहीं कोणी सुहृज्जना ।। ऐसीया संकटीं मातें घातलें विधिनें कसें।।३।। शास्त्रोक्ती हिनसे गवी परिपूर्वी त्रितायुगीं।। रामा रामा वदे रामा ऐसें रामायणी पहा।। ४।। नयाधारें वरातें मी लिहितें पत्रिका अशी।। कोणी दोष नठेवावा सज्जना हे विज्ञापना ।।५।।

प्राणपती मम सौभाग्य मीनोदक पतिराय स्वामीचे चरणी सेवापरायण पुण्यार्थभागिनी सौभाग्यवती भार्या नाव आइनाव दोनी कर जोडून दंड

सद्दश प्रणिपात विज्ञापना तागाईत महिना पक्ष तीथ वार पावेतों स्वामीचे चरणस्मरणेंकरून प्रियंगनेचें वृत्त यथास्थित असे विशेष मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा सदैव पत्र येउन सांभाळ जाला पाहिजे शेवेसि विदित होय हे विज्ञापना

विज्ञापना तागाइत महिना पक्ष तीथ वार पावेतों स्वामीचरण क्रपेंकरून सुखरूप आहें विशेष मजकूर जो लिहिणें असेल तो ल्याहावा तिकडून पत्र येऊन इकडील समाचार घेत जावा चरणसेवेसि हे विज्ञापना.

## योग्यतेचे यवनलोकांस हिंदु गृहस्थानी लिहिण्याचा शिरस्ता.

अजम अक्रम अतीजाद दोस्त नाव
विशेषण दाम महबतहू

अजि दिल ये कलास नाव विनाव मुकाम सलाम बाजद सलाम महवलमकसूद येथील खैरखुशी जाणोन आपली शादमानी कलमी हमेशा करीत असावें दिगर मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा हमेशा खत खतूत पाठवून दिल आराम करीत असावें ज्यादा काय लिहिणें प्यार मोहबत असोंदीजे हे किताबत रवाना शिती

महिना पक्ष तीथ शक संवत्सर.

## सामान्यपक्षी यवन लोकास गृहस्थानी लिहिण्याचा शिरस्ता.

अजम भाई नाव विशेषण दामोबतकु

अजिदिल एकलास नाव बिनाव मुकाम सलाम बाजद सलाम अंकी दिगर मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा हरवख्त खत खतुत पाठवून दिल आराम करीत जावें ज्यादा काय लिहिणें प्यार मोहबत असोंदीजे हे किताबत.

## साहेबलोकांस थोरपदवीचे गृहस्थानें ल्याहावयाचा शिरस्ता.

अजम मरुर अमुक साहेब इ-

अजम मरुर अमुक साहेब इस्कोयरदामोबतकु

महबत व मवदत पन्हा मोहिवान मुखलिसान दस्तगाहाय अतिजादर दोस्तां अजिदिल येकलास नाव विनाव मुकाम सलाम बाजद सलाम महवलमकसुद अंके येथील खैर खुषी जाणून आपली शा

दमानी हमेशा कलमी करीत असिलें पाहिजे दिगर जो मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा हर हमेशा रवत खुत येउन दिल आराम करीत असावें रवाना तारीख महिना सन जादा काय लिहिणें प्यार मोहबत असों दीजे हे कितावत.

## साधारण साहेब लोक यांस गृहस्थानी लिहिण्याचा शिरस्ता.

साहेब मुष्फक मेहरबा कर्म फर्माय दोस्ता अमुक साहेब बाहादुर सलमलाहु ताला.

अजिसोब नाव बिनाव सलाम बाजद सलाम रवेर यत अजाम येथील खेर यत अजाम येथील रवेर सला तागाईत तारीख माहे सन पावे तों जाणोन आपली शादमानी हमेशा कलमी करीत असिलें पाहिजे दिगर आसाहेबा कडून बहुत दिवस पत्र येउन दिल ताजा होत नाहीं त्यास हर हमेशा पत्र पाठवून रवेर खुशी लिहित जावी मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा जादा काय लिहिणें प्यार मोहबत असों दीजे हे कितावत.

## ईश्वरपरायण थोर पदवीचे ब्राह्मणास यवन लोकांनीं ल्याहावें.

हकायेक अगाहा नाव विशेष
ण दाम अलताफहू

नियाजमंद नाव पदवीपरत्वें विशेषण बादनियामारूज अंके येथील खेर अफियत जाणोन आपली शादमानी हम्मेशा कलमी करून दिल आराम करीत असिलें पाहिजे दरविला मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा हमेशा आपणाकडील खतखतुत पाठवून खुष वक्त करितजावें जादाचे अयामेपादमानी मुदाम मुस्तदाम बकामबाद.

## श्रीमंत राजे भोंसले यांस साहेब लोकांनीं लिहिण्याचा शिरस्ता.

साहेब मुष्फक मेहेरबान कदर
दान करम फर्मायदोस्तां श्रीमंत
राजश्री नाव विशेषण सलाम
लाकुलाला.

अजिदिल येकलास साहेबाचें नाव अमुक पदवीचें विशेषण

सलाम बाजद सलाम खेरियत अंजाम येथील खैरयत ताग ईत माहे तारीख सन इसवी पावेतों खेरियत असे दिगर आ साहेबीं तारीख अमुक माहे अमुकचें खत रवाना केलें तें नेक वक्त रसिद होऊन शादमानी हासिल जाहाली. खतांत आसा हेबीं अमुककाम मजमुन कलमी केलें तें खुब दिलांत भरलें हरवक्त खेर खुशीची खबर देऊन दिल आराम करीत असावें ज्यादा काय लिहिणें प्यार मोहबत असोंदीजे हे किताबत.

## छत्रपती राजे यांस साहेब लोकां नी लिहिण्याचा शिरस्ता.

श्रीमन्महाराज छत्रपती साहे
ब दाम अलताफहु

नियाजमंद अमुक साहेब अमुक विशेषण अमुक स्थळ बाद नीयाज मारूज हमुल अंके नियाजमंदाचे खेरयत रोषन होऊ न हमेशा तलतुफनामा फिरस्तादे करून सरफराज करीत असिलें पाहिजे दरविला मजकूर लिहिणें असेल तें ल्याहावा. हे मेशा आपले कडील खत खतुत पाठवून खुषवक्त करीत जावें. जादा वें अयाम शादमानी मुदाम मुस्तदाम बकाम बाद.

# थोर गृहस्थानीं कलेकटर व रिशिदंटसाहेबलोकयांस लिहिण्याचा शिरस्ता.

अज्जीम दोस्त अमुकसाहेब इस्कोयरबाहादुर दामोबतहु.

रिफायतवमा अलिमर्तबतह शामतव शौकतमनील नकजमो
हिबाय अतिजाद दोस्तां अजिदिल येखलास नाव बिनाव मुका
म बाआदृज तमन्नाय मवासिल नमोफुरुलनसरत मकषुफराय
मेहेरआराय अंके मजकूर लिहिणें असेलतो त्याहावा हरहम्मेशा
वतखतुत येउन दिलआराम करीत असावें रवाना तारीख माहे
सन इसवी जादाकाय लिहिणें प्यार मोहबत असोंदीजे हेकिताबत.

## गवरनर साहेबयांस अर्जी.

गरीब परवर्ष फेन बक्षफेन रसान कबीले
वेकसान इजतखय मर्दमर्दान अलीशान
मेहेरबान संस्थान अमुक येथील हुनराबल
गवरनर साहेबयांसि

साहेबाचे खिजमतीस नाव बिनाव राहाणार सुरुसन मया

तैनव अलफ कारणें अर्ज करितों ऐसाजे जो मजकूर लिहि णें असेल तो ल्याहावा. हा अर्ज ध्यानीं घेऊन मज गरिबाचें कार्य करणार धणी समर्थ आहेत तारीख महिना सन इ-सवी.

सई अर्जकरणाराची नाव बि
नाव आडनाव मुकाम.

## सरकारचा कारकून याणें साहेब लोकांस लिहिणें तर

हजरत खुदावंत न्यामत फिलिद साहेबाचें
नाव साहेब बाहादूर सदर दिवानी अदालत
याचे खिजमतीस.

अर्जदास्त फिदवी नाव बिनाव आदाय आदाबत सलिमात व कुर्णिशात बंदगी बजावर्द अजमेर सानंद हकीकत तागाईत मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा जनाबास रोषन होय जादा चे हादे आदाब.

## सदर अदालतींत राजीनामा लिहून देण्याचा शिरस्ता.

अलीशान साहेबाचें नाव बाहा
दुर जिल्हा प्रांत.

राजीनामा नाव बिनाव आडनाव राहाणार कारणें राजिनामा लिहून देतों ऐसाजे फलाणे गृहस्थाकडे आमचें अमुक कर्ज येणें त्याचा नंबर सन अमुक सालीं केला आहे त्यास वादीयांणीं तिराइताचे विद्यमानें तोडजोड करून अमुक रुपयांची हासे वंदी करून छापिल कागदावर लिहून दिल्हेले ऐवजास तारणें लाऊन दिल्हेलीं आमचे स्वाधीन करून समजूत केली त्याजवरून आह्मी समजलों सदरहू नंबराचे फिर्यादीचा दावा अमुकाकडे आमचा कांहीं राहिला नाहीं हा राजीनामा आह्मी आपले राजीखुषीनें लिहून दिल्हा सही. तारीख महिना सन इसवी अमुक अंक

सही अथवा निशाणी मालकाची

साक्षी.

## पावती सरकारांत देण्याचा शिरस्ता

सरकार कंपनी इंग्रेज बाहादूर विद्यमान काले
कटरसाहेब जिल्हा अमुक सुभा तालुके अमुक

पावती बिद्गामी नाव बिनाव आडनाव राहणार सुरुसन लिहून देतों पावती ऐसीजे मजकुराची सबब लिहिणें असेलती त्याहावी

मुभा किंवा तालुके मजकूरचे तिजोरींतून रुपये अंकी अक्षरीं अमुक दिल्हे ते आह्मी खुद भरून पावलों हीं लिहून दिल्ही पावती सई तारीख महिना सन इसवी महिना पक्ष तीथ शाक संवत्सर.

सई अथवा निशाणी.

साक्षी असाव्या.

## मुकत्यारनामा लिहून देण्याचा शिरस्ता.

सरकार सवकालेकटर साहेब जिल्हा

अमुक प्रांत अमुक.

मुकत्यारनामा बेशमी नाव बिनाव आडनाव राहाणार मुकाम आमचा वादी नाव बिनाव आडनाव याजवर अर्जी अमुक सनांत अमके तारखेस केली आहे तो नंबर चोकशीस निघेलयास्तव मी हजीर जाहालों प्रस्तुत अमुक कारणानें मी अर्ज केल्यावरून मुकत्यार देऊन घरीं जाणें विशीं हुकूम जाहाला त्याजवरून माझे निसबत अमुक असामीस अकत्यार दिला आहे तरि अर्जीचे नंबराप्रकरणीं जोजाब साल करणें पडेल तो आमचे निसबतीनें सदरहू आसामी करील तो आह्मांस कबुल आहे हा मुकत्यारनामा आह्मी आपले अकल हुशारीनें यखुषरजाबंदीनें लिहून दिल्हा सई तारीख माहे इसवी सन अमुक.

सही अथवा निशाणी.

साक्षी असाव्या.

## फकीरास सर्वांनी लिहिण्याचा शिरस्ता.

शाहाजा नाव वली सलामउ

शियादत वसराफत दस्तगाहा नाव बादन शौला दुलाकात इनत बकुनत आयाम मकसुफन मुनकीरजजीर गर्दानीद मे आयेदरबिला मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा हे किताबत.

## शूरसरदारांस लिहिण्याचे शिरस्ते.

### उत्तम.

### शौर्यास लाहान योग्यतेचा नेल्याहावें.

खदीव पह सवारा नशाहा नवमः

बुद्जवामर्दान अलिनिशाणनाः

द विशेषण दाम जिल्हू.

अजबंदे खाक सारक मखीन नाव विशेषण आडनाव आदान अदावबजावर्दा मारुज अंको मजकूर लिहिणें असेल तो ल्या

हावा जादावे हदे आदाब

## मध्यम प्रकार साम्यतेचानीं साम्यतेचास बराबरीनें लिहि ण्याचा शिरस्ता.

मकबुल जवामर्दानी षनी अव
खदिव पैकरसाजानवर्दास नाव
विशेषण दाम अलताफकु.

अजनानिब नाव आड नाव विशेषण सलाम बाजत सलामअं की मजकूर लिहिणें असेल तो त्याहावा अयामषादमानी मुदा मबकामबाद.

## कनिष्ठ ह्मणजे आपण लिहि णारा थोर योग्यतेचा आणिज्या स लिहितो तो लाहान अथवासे वकांस लिहिण्याचा शिरस्ता.

सुजात षार वषाहामत दिषार
नाव सलमकु.

अजसोव नाव विशेषण सलाम अंकी मजकूर लिहिणें असेल तो त्याहावा जादाचे

## सेवकानें यजमानास लिहिण्याचा शिरस्ता.

हजरतखुदावंत न्यामत नाव
विशेषण मदजिलकुताला.

खिजमतीस नाव बंदगी मारुज अंकी येथील खैर तागाईत तारीख महिना पावेतों फिदवीलोकांचें वर्तमान आराम असे बंदगीस रोषन होय हे दास्त अगरहे किताबत.

## बराबरीस लिहिण्याचा शिरस्ता.

भाईसाहेब नाव विशेषण दा
मोहबतङ्क.

साहेब मेहरवानदोस्तां अजिदिल एकलास नाव विशेषण सलाम बाजद सलाम मह वलमकसुद अंकी येथील खैरजाणोन साहेब खैरखुषी कुलमी करून दिलताजा करीतजावा दिगर मजकूर लिहिणे असेल तो त्याहावा ज्यादाकाय लिहिणें प्यार मोहबत कीजे हे किताबत.

## बहुत थोर योग्यतेचा असेल त्यास लिहिण्याचा शिरस्ता.

हजरत किबलदुज्याहावाला
मुनाकब नाव विशेषण मदजि
लहुताला.

खिजमतीस नाव आडनाव मुकाम अर्जकुर निशात तसलिमान अंकी येथील खैरजाणोन साहेबी दुवा फर्मावीत जावा दिगर मजकूर लिहिणें असेल तो त्याहावा बंदगीस रोषन होय

---

## यवनानी हिंदुलोकांस लिहिण्याचा शिरस्ता.

राव अज्जम नाव विशेषण दा
मोहलहु

रावसाहेब मेहेरबान दोस्तां नाव विशेषण सलाम बाजदसलाम अंकी येथील खैरजाणोन रावसाहेबीं आपली खेरकलमां करून शादमानी करीत जावी दिगर मजकूर लिहिणें तो त्याहावा ज्यादा काय लिहिणें मोहबत कीजे हे किताबत.

## लेंकानें बापास लिह्णियाचा
### शिरस्ता.

किबेलगाहवाले साहेबाचे खि
जमतीस फर्जंद

नाव अर्जकुर निशात तसलिमात अंकी येथील खेरजाणो न साहेबीं दुवा फर्मावीतजावा दिगर मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा बंदगीस रोषन होय

## बापानें लेंकास लिह्णियाचा
### शिरस्ता.

बरखुर्दार साजतमंदे नाव अजतर्फ नाव विशेषण दुवा अंकी मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा जादा काय लिहिणें

## सरकारांतून मामलेदारास.

-इजत असार नाव बिनाव आडनाव अंकी दिगर मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा मालुम होय हे किनाबत महिना सन अमुक.

## उमेदवारांस लिहिण्याचा शिरस्ता.

येखलासदस्तगाहा नाव बिनाव आडनाव सलाम अंकी दिग र मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा मालुम होय हे किताबत

## जमीदारयांस लिहिण्याचा शिरस्ता.

जुबदतुलयकरान देशमुख व देशपांड्यान परगणे अमुक मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा जाणीजे चंद्र किंवा तारीख महिना सुरुसन अथवा इसवी सन

## मोकदम गांवगंनायांसि.

ताहां मोकदम कसबे अथवा मौजे गावाचें नाव परगणे अमुक सुरुसन अमुक मजकूर लिहिणें असेल तो ल्याहावा जाणीजे चंद्र अमुक महिना अमुक मोर्तब.

## लेंकानें आईस लिहिण्याचा शिरस्ता.

हजरत वालिदा मासाहेबाचे खिजमतीस नाव तसलिमात मारूज अंकी दिगर मजकूर लिहि

णें असेल तो ल्याहावा हे किताबत.

## सातारकर राजे यांस सर्वांनी लिहिण्याचा शिरस्ता साधारण

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपती स्वा
मीचे शेवेशि.

विनंती सेवक नाव विनाव आडनाव मुकाम विज्ञापना ता गाईत महि॰ स तीथ पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून सुखरूप असे. अथवा सेवकाचें वृत्त यथास्थीत असे विशेष मजकूर लिहिणे असेल तो ल्याहावा शेवेसिश्रुतहोय हे विज्ञाप ना

## महाराजांनी सेवकास अथवा इतरांस सामान्यपक्षीचे गृहस्थास लिहिण्याचा शिरस्ता.

राजश्री नाव विनाव आडनाव यासि आज्ञाकेली ऐसीजे मजकूर लिहिणें असेलतो ल्याहावा जाणिजे चंद्र अमुक महिना अमुक सुरुसन अमुक मोर्तब.